MERC

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई- ४०० ००५.

दूरध्वनी:०२२-२२१६ ३९६४ / ६५ / ६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६ ई-मेल: mercindia@mercindia.org.in वेबसाईट: www.mercindia.org.in


जाहिरात क्र.२/२०११-१२

## पाहिजेत

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) नव्याने निर्माण झालेली पदे सरळसेवा / प्रतिनियुक्तीच्या तत्त्वावर भरण्यासाठी अर्ज मागवित आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | मंजूर पदे | आरक्षण |
|---|---|---|---|
| १. | कार्यकारी संचालक | १ | अराखीव |
| २. | संचालक (प्रशासन आणि वित्त) | १ | अराखीव |
| ३. | संचालक (विद्युत अभियांत्रिकी) | १ | अजा |
| ४. | संचालक (वीज दर) | १ | अजा |
| ५. | संचालक (विधी) | १ | अराखीव |
| ६. | उप संचालक (प्रशासन आणि वित्त) | ४ | २ अराखीव, १ अजा, १ अज |
| ७. | उप संचालक (तांत्रिक) | ८ | ४ अराखीव (१ महिला), १ अजा, १ अज, १ विजा (अ) / भज (ब) / भज (क) / भज (ड), १ इमाव |
| ८. | उप संचालक (विधी) | ४ | २ अराखीव, १ अजा, १ अज |

- वर नमूद केलेल्या आरक्षित पदांची संख्या आयोगाच्या बिंदू नामावलीच्या प्रस्तावास शासनाच्या मान्यतेस अधिन राहून असेल.
- उप संचालक (तांत्रिक) च्या ४ अराखीव पदापैकी १ पद महिलांसाठी राखीव राहील.
- उप संचालक (तांत्रिक) च्या ४ राखीव पदापैकी १ पद विजा (अ) साठी राखीव राहील. तथापि, विजा (अ) या प्रवर्गातील सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास, भज (ब) किंवा भज (क) किंवा भज (ड) या प्रवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

| अ. क्र. | पदाचे नाव आणि वेतनश्रेणी (रू.) | वय | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १. | **कार्यकारी संचालक** (३७,४००-६७,००० ग्रेड पे - १०,०००) | उमेदवाराचे कमाल वय ५० वर्षाहून अधिक नसावे.<br>प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही. | (अ) विद्युत अभियांत्रिकी/ विद्युत यंत्रणामधील (पॉवर सिस्टीम) पदव्युत्तर पदवी.<br>किंवा<br>(ब) एआयसीटीईने मान्यता दिलेल्या विद्यापीठ/संस्थेमधून वित्तीय व्यवस्थापन / वीज व्यवस्थापन मधील २ वर्षाचा एमबीए यासह विद्युत अभियांत्रिकी मधील पदवी किंवा अर्थशास्त्र/वित्तीय व्यवस्थापन/विद्युत यंत्रणामधील (पॉवर सिस्टीम) डॉक्टरेट.<br>(क) अर्थशास्त्र/वित्तीय व्यवस्थापन/विद्युत | (अ) विद्युत क्षेत्र / विद्युत कंपनी / परवानाधारक यामधील किमान १५ वर्षांचा अनुभव;<br>(ब) इंग्रजी आणि मराठी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;<br>(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक;<br>(ड) निर्मिती, पारेषण आणि वितरण प्रणाली व नियोजन, वीज दर निश्चितीकरण, आर्थिक विश्लेषण, प्रतिकृती (मॉडेलिंग) आणि सांख्यिकी तंत्र या कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास अधिक पसंती देण्यात येईल. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | यंत्रणा मधील डॉक्टरेट असणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. | |
| २. | **संचालक (प्रशासन आणि वित्त)**<br>(३७,४००-६७,००० ग्रेड पे - ८,९००) | उमेदवाराची कमाल वयोमर्यादा ४५ वर्षाहून अधिक नसावी.<br>प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही. | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी.<br>किंवा<br>(ब) सीए/ आयसीडब्ल्युए/ चार्टड फायनान्सिअल ॲनालिस्ट (सीएफए)/ किंवा एआयसीटीई मान्यताप्राप्त विद्यापीठ/ संस्थेचा (वित्त / मानव संसाधन (मनुष्यबळ) विषयातील दोन वर्षाचा एमबीए. | (अ) केंद्र/राज्य शासकीय विभाग, उपक्रम किंवा विद्युत कंपन्या किंवा विद्युत नियामक आयोग किंवा सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यामधील वित्त/ मनुष्यबळ विकास विभागातील १० वर्षांचा अनुभव आवश्यक;<br>(ब) उत्कृष्ट इंग्रजी आणि मराठी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;<br>(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक. |
| ३. | **संचालक (विद्युत अभियांत्रिकी)**<br>(३७,४००-६७,००० ग्रेड पे - ८,९००) | उमेदवाराचे कमाल वय ४५ वर्षाहून अधिक नसावे.<br>प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही. | विद्युत अभियांत्रिकी/विद्युत यंत्रणा मधील (पॉवर सिस्टीम) पदव्युत्तर पदवी. | (अ) नियामक आयोग/विद्युत क्षेत्र/ विद्युत कंपनी/परवानाधारक यामधील किमान १० वर्षांचा अनुभव.<br>(ब) इंग्रजी आणि मराठी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य.<br>(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक.<br>(ड) निर्मिती, पारेषण, वितरण, नूतनशील ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता यामध्ये अनुभव असणाऱ्या उमेदवारास अधिक पसंती देण्यात येईल. |
| ४. | **संचालक (वीज दर)**<br>(३७,४००-६७००० ग्रेड पे - ८,९००) | उमेदवाराचे कमाल वय ४५ वर्षाहून अधिक नसावे.<br>प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही. | (अ) विद्युत/पॉवर अभियांत्रिकीमधील पदवीबरोबरच एआयसीटीईची मान्यता असलेल्या विद्यापीठ/संस्थेतून वित्तीय व्यवस्थापन/वीज व्यवस्थापनामधील दोन वर्षांचा एमबीए किंवा सनदी लेखापाल.<br>किंवा<br>(ब) अर्थशास्त्र / वाणिज्य / सांख्यिकी विषयात मास्टर डिग्री किंवा अर्थशास्त्र/वित्तीय व्यवस्थापनामध्ये डॉक्टरेट.<br>किंवा<br>(क) मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवीसह एआयसीटीईची मान्यता असलेल्या विद्यापीठ/संस्थेमधील एमबीए किंवा सनदी लेखापाल.<br>(ड) अर्थशास्त्र / वित्तीय व्यवस्थापन विषयात डॉक्टरेट मिळविणाऱ्या | (अ) वीज दर निश्चितीकरण प्रक्रियेचा ५ ते ७ वर्षांचा किमान अनुभव;<br>(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;<br>(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक;<br>(ड) निर्मिती, पारेषण, वितरण, नूतनशील ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता आणि वीज व्यापार, अणि आर्थिक विश्लेषण करण्याची योग्यता, प्रतिकृती (मॉडेलिंग) आणि सांख्यिकी तंत्र या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. | कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास अधिक पसंती देण्यात येईल. |
| **५.** | **संचालक (विधी)** (३७,४००-६७००० ग्रेड पे - ८,९००) | उमेदवाराचे कमाल वय ४५ वर्षाहून अधिक नसावे.<br>प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही. | मान्यताप्राप्त विद्यापीठ / विधी शाळा (लॉ स्कुल) मधील कायदेविषयक पदव्युत्तर पदवी | (अ) पदवी प्राप्त केल्यानंतर, कोणत्याही सार्वजनिक / खाजगी क्षेत्रातील संस्था किंवा सार्वजनिक प्राधिकरण यांच्या विधीविषयक बाबी हाताळताना, न्यायिक/अर्ध-न्यायिक संस्थासारख्या विविध न्यायालयात प्रतिनिधीत्व करण्याचा, किमान १० वर्षांचा वकिलीचा अनुभव. उमेदवारास ॲडव्होकेट्स अधिनियम, १९६१ मधील व्याख्येनुसार एक ॲडव्होकेट म्हणून न्यायालय/न्यायाधीकरण/मंच, इ. मध्ये वकिली करण्याचा किमान ४ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य.<br>(क) संगणकविषयक ज्ञान आवश्यक.<br>(ड) विद्युत क्षेत्र/नियामक आयोगामध्ये किमान ३ वर्ष कामाचा अनुभव असल्यास अधिक पसंती. |
| **६.** | **उप संचालक (प्रशासन आणि वित्त)** (१५,६००-३९,१०० ग्रेड पे - ७,६००) | उमेदवाराचे कमाल वय ४० वर्षाहून अधिक नसावे.<br>प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही. | मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी.<br>किंवा<br>सीए/ आयसीडब्ल्युए/ चार्टड फायनान्सिअल ॲनालिस्ट (सीएफए) किंवा एआयसीटीई मान्यताप्राप्त विद्यापीठ/संस्थेचा [(वित्त / मानव संसाधन (मनुष्यबळ)] विषयातील दोन वर्षाचा एमबीए. | (अ) केंद्र/राज्य शासकीय विभाग, उपक्रम किंवा विद्युत कंपन्या किंवा विद्युत नियामक आयोग, वित्त संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी किंवा प्रख्यात हार्डवेअर कंपन्यांमधील वित्त किंवा मानव संसाधन विकास किंवा संगणक अभियांत्रिकी कामाचा ७ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य.<br>(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | **उप संचालक (तांत्रिक)** (१५,६००-३९,१०० ग्रेड पे - ७,६००) | उमेदवाराचे कमाल वय ४० वर्षाहून अधिक नसावे.<br>प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही. | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठातून विद्युत / पॉवर अभियांत्रिकीमधील पदवी<br>किंवा<br>(ब) विद्युत अभियांत्रिकी / विद्युत यंत्रणामधील (पॉवर सिस्टीम) पदव्युत्तर पदवी किंवा एआयसीटीईची मान्यता असलेल्या विद्यापीठ/संस्थेमधून वित्तिय व्यवस्थापन/वीज व्यवस्थापनामध्ये दोन वर्षांचा एमबीए.<br>किंवा<br>(क) मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवीसह एआयसीटीईची मान्यता असलेल्या विद्यापीठ/संस्थेमधील एमबीए किंवा सनदी लेखापाल.<br>(ड) विद्युत अभियांत्रिकी / विद्युत यंत्रणामधील पदव्युत्तर पदवी किंवा एआयसीटीईची मान्यता असलेल्या विद्यापीठ/संस्थेमधील एमबीए (वित्तिय व्यवस्थापन/वीज व्यवस्थापन) किंवा सनदी लेखापाल या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. | (अ) विद्युत क्षेत्र / विद्युत कंपनी / परवानाधारक / नियामक आयोगामध्ये कामाचा किमान ७ वर्षांचा अनुभव;<br>(ब) इंग्रजी आणि मराठी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;<br>(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक.<br>(ड) निर्मिती, पारेषण, वितरण, नूतनशील ऊर्जा आणि ऊर्जा कार्यक्षमता आणि आर्थिक विश्लेषण करण्याची योग्यता, प्रतिकृती (मॉडेलिंग) आणि सांख्यिकी तंत्र या कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास अधिक पसंती देण्यात येईल. |
| ८. | **उप संचालक (विधी)** (१५,६००-३९,१०० ग्रेड पे - ७,६००) | उमेदवाराचे कमाल वय ४० वर्षाहून अधिक नसावे.<br>प्रतिनियुक्ती वरच्या व्यक्तीसाठी लागू नाही. | मान्यताप्राप्त विद्यापीठ / विधी शाळा (लॉ स्कुल) मधील कायदेविषयक स्नातक पदवी. | (अ) पदवी प्राप्त केल्यानंतर, कोणत्याही सार्वजनिक / खाजगी क्षेत्रातील संस्था किंवा सार्वजनिक प्राधिकरण यांच्या विधीविषयक बाबी हाताळताना, न्यायिक/अर्ध-न्यायिक संस्थासारख्या विविध न्यायालयात प्रतिनिधीत्व करण्याचा, किमान ७ वर्षांचा वकिलीचा अनुभव. उमेदवारास ॲडव्होकेट्स अधिनियम, १९६१ मधील व्याख्येनुसार एक ॲडव्होकेट म्हणून न्यायालय/न्यायाधीकरण/मंच, इ. मध्ये वकिली करण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक; |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | (ब) विद्युत क्षेत्र/नियामक आयोगामध्ये किमान २ वर्षांचा कामाचा अनुभव असल्यास अधिक पसंती;<br>(क) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;<br>(ड) संगणकविषयक ज्ञान आवश्यक. |

इच्छुकांनी आपले अर्ज संपूर्ण तपशीलासह विहित नमुन्यामध्ये आयोगाचे सचिव यांच्याकडे वरील पत्त्यावर पोस्टाने किंवा कुरीयरमार्फत सोमवार, दिनांक १ ऑगस्ट, २०११ रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा बेताने पाठवावेत.

अधिक तपशीलासाठी, आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेत स्थळाला कृपया भेट द्यावी.

सही/-
(के.एन.खवारे)
सचिव
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

दिनांक: १५/०६/२०११

मुंबई : मुंबई